महाराष्ट्राचे निडर दैनिक

# शौर्य मराठी

RNI-MAHMAR/2023/89125

epaper.shauryamarathi.com | जळगाव, धुळे, नंदुरबार | बुधवार, दि. ११ फेब्रुवारी २०२६ | वर्ष २ रे | अंक ९३ किंमत : ५ रु. | पाने ४


**दिन विशेष...**

१८४७ : सुप्रसिध्द अमेरिकन संशोधक, विद्युत प्रकाश व ध्वनी उपकरणांचे जनक एडिसन थॉमस आल्वा यांचा जन्म झाला.
१९२३ : प्रसिध्द हॉकीपटू त्रिलोचनसिंग बाबा यांचा जन्मदिन.
१९४२ : जमनालाल बजाज यांचा स्मृतिदिन.
१९७९ : अंदमान-निकोबार येथील सेल्युलर जेलला राष्ट्रीय स्मारक म्हणून मान्यता मिळाली.

सेन्सेक्स ८४,२७३.९२ +२०८.१७ (०.२५%)
डॉलर ₹ ९०.५४

आजचे तापमान (डिग्री सेल्सिअस)

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| जळगाव | ३४ | १७ |
| दिल्ली | २७ | १३ |
| मुंबई | ३२ | २० |
| नागपूर | ३१ | १६ |
| पुणे | ३२ | १२ |

**सुविचार**

समुद्राच्या गहिराईप्रमाणे, प्रेमाचे खरे मूल्य त्याच्या अथांगतेत आहे.

सूर्योदय - सूर्यास्त
स.-७:०० संध्या-६:२०

**सोने - चांदी**

सोने(१० ग्रॅम) - चांदी (प्रति किलो)
१,५७,८७०/- २,९०,०००/-

**केळी भाव**

नवती : १३५५ ते १३६०
पिल बाग : ११०१ ते ११०२
कांदे बाग : ----

## थोडक्यात

### मणिपूरमध्ये पुन्हा हिंसाचार उफाळला

**उखरुल ।** मणिपूरमध्ये हिंसाचार उसळल्याची माहिती समोर आली आहे. लिटन सारीखोंग गावात सशस्त्र हल्लेखोरांनी अनेक घरांना आग लावल्याचे सांगण्यात येत आहे. पुढील हिंसाचार आणि अफवा रोखण्यासाठी अधिकाऱ्यांनी संपूर्ण जिल्ह्यात कर्फ्यू लागू केला आहे. एवढेच नाही तर पाच दिवसांसाठी इंटरनेट सेवा बंद ठेवली आहे.

### नागपूर- मुंबई, पुणे मार्गावर सुपरफास्ट विशेष गाड्या धावणार!

**जळगाव ।** मध्य रेल्वे प्रशासनाने प्रवाशांची वाढती गर्दी लक्षात घेता फेब्रुवारी महिन्यात छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (सीएसएमटी), लोकमान्य टिळक टर्मिनस आणि पुणे येथून नागपूरसाठी विशेष सुपरफास्ट गाड्या सोडण्याचा निर्णय घेतला आहे. सण-समारंभ, लग्नसराई तसेच व्यावसायिक व शैक्षणिक प्रवास करणाऱ्या प्रवाशांना यामुळे मोठा दिलासा मिळणार आहे. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ते नागपूर दरम्यान दोन विशेष सेवा चालवण्यात येणार आहेत.

# लोकसभा अध्यक्षांविरोधात अविश्वास दाखल

## माजी लष्करप्रमुख नरवणे यांच्या अप्रकाशित आत्मचरित्राचा संदर्भ देण्यापासून राहुल गांधींना रोखल्याने वाढला तणाव

वृत्तसंस्था । दिल्ली

**सरकार आणि विरोधी पक्षांमधील संघर्ष अधिक तीव्र होत असल्याचे चित्र आहे. 'इंडिया' आघाडीने लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला यांच्याविरोधात अविश्वास ठराव सादर केला आहे. तृणमूल काँग्रेसनेही (टीएमसी) या निर्णयाला पाठिंबा दिला आहे. विरोधी पक्षाला हा ठराव लवकरात लवकर मांडायचा होता आणि त्यासाठी खासदारांच्या स्वाक्षऱ्या गोळा करण्याचे काम सुरू होते. अखेर हा ठराव सादर करण्यात आला आहे. विरोधकांनी लोकसभा अध्यक्षांविरोधात अविश्वास प्रस्ताव का आणला? संसदेतील संघर्ष टोकाला कसा पोहोचला आहे? याविषयी चर्चा होत आहे.**



- विरोधी पक्षनेत्याला बोलू दिले नाही
- पंतप्रधानांवर हल्ल्याचा कटचा उल्लेख
- वारंवार अध्यक्षांकडून अडचणींचा सामना

**• अविश्वास प्रस्तावाची कारणे काय?**

माजी लष्करप्रमुख जनरल एम. एम. नरवणे यांच्या अप्रकाशित आत्मचरित्राचा संदर्भ देण्यापासून विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांना रोखल्यामुळे अध्यक्ष आणि विरोधी पक्षांमधील तणाव वाढला. गुरुवारी हा संघर्ष टोकाला पोहोचला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या भाषणाशिवाय राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील आभार प्रदर्शन ठराव लोकसभेत मंजूर करण्यात आल्याने विरोधक नाराज होते. काही काँग्रेस खासदार पंतप्रधानांच्या आसनापर्यंत जाऊन हल्ल्याचा कट रचत असल्याची माहिती आपल्याकडे असल्याचे बिर्ला यांनी सभागृहात सांगितले होते. त्यामुळेच त्यांनी मोदींना बुधवारी सभागृहात न येण्याची विनंती केली होती, असेही ते म्हणाले. सूत्रांच्या म्हणण्यानुसार, हे विधान आणि इतर घडामोडी या अविश्वास ठरावाचे मुख्य कारण असावे.

सोमवारी झालेल्या बैठकीत बिर्ला यांच्यावर करण्यात येत असलेल्या विविध आरोपांवर चर्चा झाली. ते म्हणाले, 'पहिले कारण म्हणजे लोकसभेत विरोधी पक्षनेत्याला बोलू दिले गेले नाही; दुसरे कारण म्हणजे, अध्यक्षांनी असा दावा केला की, पंतप्रधानांवर सभागृहात हल्ला होऊ शकतो आणि त्यांनीच पंतप्रधानांना येऊ नये, असे सांगितले. तिसरे कारण, महिला खासदार पंतप्रधानांवर हल्ल्याचा कट रचत असल्याचा उल्लेख अध्यक्षांकडून करण्यात आला. आम्हाला वारंवार अध्यक्षांकडून अडचणींचा सामना करावा लागत आहे. ते सभागृहात विरोधी पक्षाला संधी देत नाहीत', अशी टीकाही त्यांनी केली. (पान २ वर)

# सुनेत्रा पवारांनी स्वीकारला उपमुख्यमंत्री पदाचा पदभार

## • राष्ट्रवादीच्या नेत्यांची होती उपस्थिती

वृत्तसंस्था । मुंबई



अजित पवार यांच्या निधानानंतर राज्याच्या राजकारणात मोठ्या घडामोडी घडल्या. त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतली. त्यांच्याकडे अर्थ खाते वगळता इतर तीन महत्वाच्या खात्यांची जबाबदारी सोपविण्यात आली. त्यानंतर त्या उपमुख्यमंत्री पदाचा पदभार कधी स्वीकारणार याविषयी बोलले जात होते. अखेर ८ दिवसांनी आज दि.१० फेब्रुवारी रोजी मंत्रालयात जात सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्री पदाचा पदभार स्वीकारला.

यावेळी त्यांच्यासमवेत पुत्र पार्थ पवार, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल आणि प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे उपस्थित होते. प्रभादेवी येथील श्री सिद्धिविनायक मंदिराचे दर्शन घेऊन आणि चैत्यभूमीवर अभिवादन करून उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार मंत्रालयात दाखल झाल्या. त्यानंतर त्यांनी अजित पवार यांच्या प्रतिमेला पक्ष कार्यालयात जात अभिवादन केले. दुसरीकडे सुनेत्रा पवार या सायंकाळी दिल्लीला देखील जाणार असल्याची माहिती आहे.

## चार दिवसांत ८६ लाखांची उलाढाल

# गोदा महोत्सवात उत्तर महाराष्ट्रातील महिलांचा डंका

वृत्तसंस्था । नाशिक

**महिलांच्या कर्तृत्वाला व्यासपीठ देणारा आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना देणारा गोदा महोत्सव २०२६ आणि विभागीय मिनी सरस मोठ्या उत्साहात पार पडला. जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा व महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान यांच्या सहकार्याने आयोजित करण्यात आलेल्या या महोत्सवाला नाशिककरांचा प्रतिसाद लाभला. चार दिवस चाललेल्या या महोत्सवात ८६ लाखांहून अधिकची उलाढाल झाली.**



येथील डोंगरे वसतिगृह मैदानात भरविण्यात आलेल्या या महोत्सवात नाशिक जिल्ह्यासह विभागातील धुळे, जळगाव, नंदुरबार येथील महिला स्वयंसहायता समूहांनी सहभाग घेतला होता. एकूण १८५ दालनांचे नियोजन करण्यात आले होते. यामध्ये १४० वस्तू विक्रीचे तर ४५ पारंपरिक ग्रामीण खाद्यपदार्थांचे दालन होते. हस्तकला, हस्तव्यवसाय, घरगुती खाद्यपदार्थ, मसाले, शेवया, पापड, सेंद्रिय उत्पादने, सजावटीच्या वस्तू तसेच दैनंदिन वापरातील विविध वस्तूंना नागरिकांकडून विशेष मागणी होती. गोदा महोत्सवाच्या माध्यमातून ग्रामीण संस्कृतीची अस्सल चव अनुभवण्याची संधी नागरिकांना मिळाली. पारंपरिक जेवणाच्या दालनांना मोठी (पान २ वर)

# समृद्धी महामार्गावरील अपघातात टँकर चालकाचा होरपळून मृत्यू

वृत्तसंस्था । राहाता

**मुंबई- नागपूर समृद्धी महामार्गावर कोपरगाव सिन्नर दरम्यान, नागपूरच्या दिशेने भरधाव वेगाने जाणाऱ्या डिझेल टँकरने पाठीमागून मालमोटारीला जोराची धडक दिल्याने झालेल्या अपघातात टँकर चालकाचा होरपळून मृत्यू झाला. अपघातानंतर महामार्गावर वाहनांच्या लांबवर रांगा लागल्या होत्या.डिझेल टँकर (एमएच ४९ बीझेड ३१८७) हा मुंबईहून नागपूरच्या दिशेने चालला होता.**



त्याने पुढे चालणाऱ्या मालमोटारीला (एमएच ०४ एफपी २००८) मागून जोराची धडक दिल्याने टँकरने पेट घेतला. हा अपघात काल, सोमवारी मध्यरात्री साडेअकराच्या सुमारास घडला. अपघात इतका भीषण होता की मालमोटार महामार्गाच्या खाली गेली. पेट घेतलेल्या टँकरमधील चालकाचा होरपळून मृत्यू झाला. शिर्डी व सिन्नर पथकर नाक्यावरील सुरक्षा पथक तसेच महामार्ग पोलिसांचे पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले.

आग विझविण्यासाठी सिन्नर तसेच समृद्धी महामार्गाच्या अग्निशामक दलाने तसेच कोपरगाव नगरपालिकेच्या अग्निशामक दलाने घटनास्थळी दाखल होत, आग विझविण्याचे काम केले. अपघातामुळे जवळपास पाच ते सहा किमी. वाहनाच्या रांगा लागल्या होत्या. दोन तासांच्या अथक प्रयत्नानंतर आग आटोक्यात आली व वाहतूक सुरळीत करण्यात आली आहे.

समृद्धी महामार्गावर अवजड व हलक्या वाहनांना वेग मर्यादेचे नियम असले तरी वेग मर्यादा नियमांचे कोणीही पालन करीत नसल्याने वारंवार या समृद्धी महामार्गावर अपघात घडत आहेत. गेल्या काही दिवसांपासून समृद्धी महामार्गावर अपघातांची संख्या पुन्हा वाढली आहे. समृद्धी महामार्गावर अहिल्यानगर जिल्ह्यातील कोपरगाव तालुक्यातील धोत्रे शिवारात काही दिवसांपूर्वीच रस्त्याच्या कडेला उभे असलेल्या नादुरुस्त ट्रेलरला भरधाव स्विफ्ट कार धडकल्याने झालेल्या भीषण अपघात ३ जणांचा जागीच मृत्यू झाला (पान २ वर)

# भारत-पाक सामना १५ फेब्रुवारीलाच होणार




वर्ल्ड कपमधील महामुकाबल्याचा सस्पेन्स संपला

वृत्तसंस्था । कोलंबो

भारत आणि पाकिस्तानमधील क्रिकेट युद्धावर मागील काही दिवसांपासून दाटलेले बहिष्काराचे ढग अखेर दूर झाले आहेत. आयसीसीने घेतलेली कठोर भूमिका आणि मित्रराष्ट्रांच्या विनंतीनंतर पाकिस्तान सरकारने नमते घेत आपल्या संघाला भारताविरुद्ध खेळण्यासाठी ग्रीन सिग्नल दिला आहे. यामुळे आता येत्या रविवारी, १५ फेब्रुवारी २०२६ रोजी कोलंबोच्या प्रेमदासा स्टेडियमवर क्रिकेट विश्वातील हा सर्वात मोठा सामना नियोजित वेळेनुसार पार पडणार आहे. (पान २ वर)

**• पाकिस्तान सरकारची सोशल मीडियावरून घोषणा**

**पाकिस्तान सरकारने अधिकृत निवेदनात म्हटले आहे की, 'मैत्रीपूर्ण राष्ट्रांच्या विनंतीचा मान राखून आणि बहुपक्षीय चर्चेतून निघालेल्या सकारात्मक निष्कर्षानंतर, पाकिस्तान संघाला टी-२० विश्वचषकातील भारताविरुद्धच्या सामन्यासाठी मैदानात उतरण्याचे निर्देश देण्यात आले आहेत'. या घोषणेमुळे क्रिकेट चाहत्यांनी सुटकेचा नि:श्वास टाकला आहे.**

# खासदार नारायण राणे रुग्णालयात दाखल

वृत्तसंस्था । मुंबई



भाजपाचे ज्येष्ठ नेते आणि खासदार नारायण राणे यांना मुंबईतील जसलोक रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, हृदयाशी संबंधित उपचारांसाठी त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले असून सध्या त्यांच्यावर डॉक्टरांचे निरीक्षण आहे.

अलीकडेच कोकण दौऱ्यावर असताना नारायण राणे यांनी एका सभेत केलेल्या वक्तव्यामुळे चर्चेला (पान २ वर)

# बारावीच्या परीक्षेला जाणाऱ्या विद्यार्थ्याचा लोकल ट्रेनमधून पडून मृत्यू




वृत्तसंस्था । ठाणे

बारावीच्या बोर्ड परीक्षेला जाणाऱ्या एका १८ वर्षीय विद्यार्थ्याचा ठाणे जिल्ह्यात लोकल ट्रेनमधून पडून मृत्यू झाला आहे. कळवा आणि मुंब्रा रेल्वे स्थानकांदरम्यान सकाळच्या गर्दीच्या वेळी हा अपघात घडला. सोहम कथरे असे मरण पावलेल्या विद्यार्थ्याचे नाव आहे.

तो डोंबिवली येथील रहिवासी होता. हा छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसला (सीएसएमटी) जाणाऱ्या ट्रेनच्या फूटबोर्डवरून प्रवास करत असताना त्याची पकड सुटली आणि तो रुळावर पडला, असे ठाणे जीआरपीच्या वरिष्ठ निरीक्षक अर्चना दुसाने यांनी सांगितले.

**• सकाळी १० वाजण्याच्या सुमारास रुळाजवळ एक जखमी किशोरवयीन मुलगा पडल्याचे रस्त्याने जाणाऱ्यांनी पाहिले आणि त्यांनी तात्काळ अधिकाऱ्यांना माहिती दिली. त्यानंतर ठाणे रेल्वे पोलिसांच्या पथकाने घटनास्थळी धाव घेतली आणि त्याला सरकारी रुग्णालयात हलवले, मात्र त्याला मृत घोषित करण्यात आले. अपघाती मृत्यूचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मंगळवारी महाराष्ट्रात बारावीच्या बोर्डाच्या परीक्षा सुरू झाल्या आहेत. कथरे हा कळवा येथील त्यांच्या परीक्षा केंद्रावर जात होता.**

# राजमाता जिजाऊ बस जळगाव एसटी विभागातून जिल्हाभरात धावणार!

## जळगाव विभागात जवळपास २०० राजमाता जिजाऊ बसेस टप्याटप्प्याने दाखल होणार

प्रतिनिधी । जळगाव

राज्याच्या गौरवशाली इतिहासाला आधुनिकतेची जोड देत महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने (एसटी) आपल्या ताफ्यात आणखी एका महत्त्वपूर्ण सेवेची भर घालण्याचा निर्णय घेतला आहे. 'राजमाता जिजाऊ' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या नव्या बसेस लवकरच जिल्ह्यातील प्रवाशांच्या सेवेत दाखल होणार आहेत. त्यामुळे गर्दीच्या मार्गांवर प्रवास करणाऱ्या हजारो प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे.




एसटी महामंडळाने यापूर्वी शिवनेरी, शिवशाही, शिवाई, यशवंती आणि हिरकणी यांसारख्या ऐतिहासिक व प्रेरणादायी नावांच्या बसेस सुरू करून प्रवासी सेवेचा दर्जा उंचावला होता. आता या परंपरेत आणखी एक मानाचे नाव जोडले जात आहे. हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मातोश्री आणि स्वराज्याच्या प्रेरणास्थान असलेल्या राजमाता जिजाऊ यांच्या नावाने या बसेसचे नामकरण करण्यात आले आहे. नवीन 'राजमाता जिजाऊ' बसेस आधुनिक ३ बाय २ लेआउटमध्ये खरेदी करण्यात आल्या आहेत. या बसेस प्रवाशांच्या आरामाचा (पान २ वर)

**• मार्च महिन्यापासून टप्प्याटप्प्याने जिल्ह्यातील विविध आगारातून या बसेस सुरू केल्या जाणार आहेत. दृश्यात्मक दृष्ट्याही या बसेस लक्षवेधी असणार असून, केशरी आणि पांढऱ्या रंगसंगतीत त्या सजवण्यात आल्या आहेत. हे रंग महाराष्ट्राच्या परंपरा, इतिहास आणि अस्मितेचे प्रतीक मानले जातात. त्यामुळे या बसेस केवळ वाहतुकीचे साधन न राहता महाराष्ट्राच्या अभिमानाचे हलते-बोलते प्रतीक ठरणार आहेत.**

## संपादकीय

### महायुतीचा डंका

राज्यातील १२ जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समित्यांसाठी झालेल्या निवडणुकीच्या निकालानंतर या ग्रामीण भागातील मतदारांनीसुद्धा पुन्हा एकदा महायुतीच्या बाजूनेच कौल दिला आहे. या निवडणुकीमध्ये महायुतीचे घटक पक्ष असलेले भारतीय जनता पक्ष, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष यांनी एकत्रितपणे निवडणूक लढवली नसली तरी त्यांना स्वतंत्रपणे जे यश मिळाले आहे ते एकत्रितपणे मोजले तर राज्याच्या ग्रामीण भागामध्येही महायुतीचाच दबदबा वाढला आहे. नुकत्याच झालेल्या नगरपालिका आणि महानगरपालिकांच्या निवडणुकीमध्ये राज्यातील नागरी मतदारांनी महायुतीच्या बाजूनेच कौल दिला होता. आता ग्रामीण भागातील मतदारांनीसुद्धा महायुतीच्याच पाठीशी उभे राहण्याचा निर्णय घेतला आहे. दीर्घकाळाने झालेल्या या निवडणुकीमध्ये काही उलथापालथ होईल असे वाटत होते. पण विधानसभा निवडणुकीनंतर राज्याच्या कानाकोपऱ्यामध्ये ज्या प्रकारे महायुतीच्या घटक पक्षाने आपला विस्तार केला होता, त्याची फळे आता समोर येताना दिसत आहेत. कोणतेही राजकारण ग्रामीण भागापासून सुरू होते आणि पंचायत समिती, जिल्हा परिषदेच्या राजकारणापासूनच कोणत्याही राजकीय पक्षाची किंवा त्यांच्या नेत्यांची मुळे घट्ट व्हायला सुरुवात होत असते. या देशामध्ये आणि राज्यामध्येसुद्धा दीर्घकाळ काँग्रेसने राज्य केले. कारण ग्रामीण भागामधील त्यांचा पाया मजबूत होता. विकास संस्था, बाजार समिती, दूध संघ, पंचायत समित्या, जिल्हा परिषद या सर्वच ठिकाणी काँग्रेसची दीर्घकाळ एक हाती सत्ता होती. नंतरच्या कालावधीमध्ये काँग्रेसमध्ये फूट पडल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसने या सर्व संस्थांवर बहुतांशी ताबा घेतला. आता शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला आत्ताच्या निवडणुकीमध्ये सर्वात कमी यश मिळालेले दिसून येते. शिवसेनेतून बाहेर पडलेल्या एकनाथ शिंदे यांची शिवसेना असो किंवा अजित पवार यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष असो या दोन्ही पक्षांनी या निवडणुकीमध्ये चांगली कामगिरी केली आहे. या उलट उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेला असे लक्षणीय यश मिळालेले दिसत नाही. काँग्रेसने आपल्या नेहमीच्या ठिकाणी म्हणजेच लातूर आणि कोल्हापूरमध्ये काही प्रमाणात यश मिळवले असले, तरी ज्या प्रमाणात भारतीय जनता पक्षाने सर्व जिल्हा परिषदांमध्ये आणि पंचायत समितीमध्ये आपले अस्तित्व लक्षणीयपणे दाखवून दिले आहे. तसे करणे काँग्रेसला किंवा शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला आणि उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना यांना जमलेले नाही. राज्यातील बारा जिल्हा परिषदां महायुतीचा डंका वाजत आहे. राज्यातील १२५ पंचायत समित्यांपैकी बहुतांशी पंचायत समित्यांमध्ये महायुतीच्या घटक पक्षांची सत्ता आहे. राज्यातील ज्या एकूण जिल्हा परिषदेच्या ७३१ जागा होत्या त्यापैकी किमान ४०० पेक्षा जास्त जागा महायुतीच्या घटक पक्षांनी आपल्या पदरात पाडून घेतल्या आहेत.

# तापी कृषी प्रदर्शन, डेअरी एक्स्पो-२०२६ चा लाभ शेतकऱ्यांनी घ्यावा

## • पणन व राज्य शिष्टाचार मंत्री जयकुमार रावल यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी । शिरपूर




**येथील कृषी उत्पन्न बाजार समितीतर्फे उत्कृष्टपणे आयोजित करण्यात आलेल्या तापी कृषी प्रदर्शन व डेअरी एक्स्पो-२०२६ चा लाभ घ्यावा असे आवाहन पणन व राज्य शिष्टाचार मंत्री जयकुमार रावल यांनी केले.**

शेतकरी बांधवांनी नवीन तंत्रज्ञान स्वीकारुन अद्ययावत चांगली शेती करावी. दुग्धजन्य व्यवसाय करा. पणन संचालक तसेच धुळे व नंदुरबार जिल्ह्यातील सर्व बाजार समिती चेअरमन, संचालक मंडळ यांनी भेट देण्याच्या मी सूचना करतो, कारण शिरपूर येथे अतिशय चांगले कृषी प्रदर्शन भरविण्यात आले आहे. आ. अमरिशभाई पटेल यांनी शिरपूर तालुक्यात सर्व क्षेत्रात उच्चप्रतीचे काम केले असून शिरपूर टेक्स्टाईल हब, शिक्षण हब म्हणून सर्वदूर प्रसिद्ध झाला आहे. मनमाड-इंदर रेल्वेमुळे संपूर्ण धुळे जिल्हा विकसित होण्यासाठी खूप मदत होणार आहे. शिरपूर रेल्वेस्टेशनवरुन जाण्याचा शिरपूरकरांना आनंद घेता येणार आहे. कृषी क्षेत्राला आपल्याला पुढे नेण्याचे काम करायचे आहे. जगातील सर्वात मोठी अत्याधुनिक कृषी उत्पन्न बाजार समिती, वाढवण बंधारे येथे १२०० एकरवर आपण करतोय. आ. अमरिशभाई पटेल व आ. काशिराम पावरा यांच्या मागणीनुसार डीपीडीसीमधून सलाईपाडासाठी निधी देत आहोत. सर्वांनी कृषी प्रदर्शनाचा लाभ घ्यावा, यापुढे पणन खात्याकडून कृषी प्रदर्शनाला मदत करणार आहोत, असे आश्वासन मंत्री जयकुमार रावल यांनी दिले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी नगराध्यक्ष भूपेशभाई पटेल हे होते. यावेळी आमदार काशिराम पावरा, आ. मंजुळा गावित, भाजपा जिल्हाध्यक्ष रामकृष्ण खलाणे, माजी जिल्हाध्यक्ष बबनराव चौधरी, जि. प. माजी अध्यक्ष डॉ. तुषार रंधे, उपनगराध्यक्ष संगीता देवरे उपस्थित होते. प्रास्ताविक के. डी. पाटील, सूत्रसंचालन मिलिंद पाटील, आभार लक्ष्मीकांत शेखर पाटील यांनी मानले.

# महिलांसाठी मोफत कर्करोग निदान शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद




प्रतिनिधी । पारोळा

**आपण समाजाचे काहीतरी देणे लागतो. या सामाजिक भावनेतून रोटरी क्लब पारोळा यांच्या वतीने तालुक्यातील महिलांसाठी मोफत कर्करोग निदान शिबिराचे आयोजन शहरातील बोहरा सेंट्रल स्कूल येथे करण्यात आले. या शिबिराला परिसरातील महिलांचा मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद लाभला.**

शिबिराचे उद्धाटन मृणाल अमोल पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुण्या म्हणून नगरसेविका किरण चंद्रकांत पाटील, अॅड. कृत्तिका आफरे, तृप्ती सुरेंद्र बोहरा व राधिका सचिन करोडपती आदी उपस्थित होत्या. उद्घाटनप्रसंगी मृणाल पाटील यांनी महिलांच्या आरोग्याबाबत जनजागृती होणे अत्यंत आवश्यक असल्याचे नमूद केले. महिलांच्या विविध आरोग्यविषयक समस्यांवर उपाययोजना करण्यासाठी असे उपक्रम सातत्याने राबविण्यात येतील, असे त्यांनी सांगितले.

# श्री गुरु तेगबहादूर यांच्या शहीद दिनानिमित्त २८ रोजी कार्यक्रम

प्रतिनिधी । धुळे

श्री गुरु तेगबहादूर यांच्या ३५० व्या शहीद दिनानिमित्त महाराष्ट्र शासनाच्या अल्पसंख्यांक विकास विभाग व राजयस्तरीय समागम समिती यांच्यावतीने दि. २८ फेब्रुवारी ते १ मार्च या कालावधीत पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमीत शाह, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व ना. सुनेत्रा पवार, अल्पसंख्यांक विभाग राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांच्या उपस्थितीत हिंद-दी-चादर हा कार्यक्रम आयोजित केलेला आहे. या ऐतिहासिक सोहळयाच्या यशस्वीतेसाठी व्यापक तयारी सुरु झालेली आहे. या कार्यक्रमाच्या माध्यमातून श्री गुरुतेगबहादूर यांचा त्याग, शौर्याचा संदेश तसेच त्यांच्या शिकवणीचा संदेश बालक, युवक आणि प्रत्येक नागरिकांपर्यंत व समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत पोहचावा यासाठी या कार्यक्रमाची आयोजन करण्यात आले आहे.

हा ऐतिहासीक व प्रेरणादायी कार्यक्रम ओवे मैदान सेक्टर २९ खारघर नवी मुंबई येथे सकाळी ८ ते रात्री १० वाजेपर्यंत आयोजन करण्यात आलेले आहे. धुळेकर नागरिकांनीही या ऐतिहासिक व प्रेरणादायी कार्यक्रमास उपस्थितीत द्यावी, असे आवाहन धुळे महानगरपालिकेमार्फत करण्यात आलेले आहे.

# महापुरुषांचा अपमान करणाऱ्या भूषण पाटीलवर मोक्का लावा

## • रिपब्लिकन सेनेचा जेल भरो आंदोलनाचा इशारा; पोलिसांना निवेदन

प्रतिनिधी । भुसावळ



**फेसबुक लाईव्हच्या माध्यमातून महापुरुषांचा अपमान, महिलांविषयी अत्यंत अश्लील वक्तव्ये आणि समाजात जातीय तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न करणाऱ्या भूषण भास्कर पाटील याच्यावर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, या मागणीसाठी रिपब्लिकन सेनेने आक्रमक पवित्रा घेतला आहे.**

या विकृत प्रवृत्तीच्या गुन्हेगारावर मोक्का अंतर्गत कारवाई करून त्याला तातडीने जिल्ह्यातून तडीपार करावे, अन्यथा संपूर्ण जिल्ह्यात जेल भरो आंदोलन छेडण्याचा इशारा रिपब्लिकन सेनेचे जिल्हाध्यक्ष विनोद सोनवणे यांनी पोलीस प्रशासनाला दिला आहे. संशयित आरोपी भूषण भास्कर पाटील (रा. डोंबिवली, जि. ठाणे) याने ६ आणि ७ फेब्रुवारी रोजी फेसबुक लाईव्हद्वारे भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्याबद्दल अत्यंत नीच आणि अर्वाच्य भाषेत विधाने केली. तसेच महापुरुषांच्या पुतळ्यांची विटंबना करण्याची जाहीर धमकी देऊन कोट्यवधी अनुयायांच्या भावना दुखावून कायदा-सुव्यवस्थेला आव्हान दिले आहे. याप्रकरणी भुसावळ बाजारपेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.आरोपीने केवळ महापुरुषांचाच अपमान केला नाही, तर स्त्रियांविषयी अत्यंत लज्जास्पद आणि अश्लील भाषेत टिपणी केली आहे. तसेच राज्याचे मंत्री ना. संजय सावकारे व त्यांच्या कुटुंबाला अश्लील शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी दिली आहे. आरोपी हा सराईत गुन्हेगार असून त्याच्यावर यापूर्वी ५ पेक्षा जास्त गंभीर गुन्हे दाखल आहेत. आरोपीची गुन्हेगारी पार्श्वभूमी पाहता त्याच्यावर तात्काळ मोक्का लावावा, आरोपीचे फेसबुक अकाउंट कायमस्वरूपी ब्लॉक करण्यासाठी सायबर सेलने तातडीने पावले उचलावीत, माहिती तंत्रज्ञान कायदा कलम ६७ आणि महिलांचा विनयभंग केल्याप्रकरणी वाढीव कलमे लावण्यात यावीत या मागण्यांचे निवेदन रिपब्लिकन सेनेच्या पदाधिकाऱ्यांनी पोलिस प्रशासनाला दिले आहे. यावेळी रिपब्लिकन सेना जिल्हाध्यक्ष विनोद सोनवणे,जिल्हा नेते दिनेश इखारे, महिला सेना जिल्हाध्यक्षा वंदना सोनवणे, वंदना आराक, देवदत्त मकासरे, राजश्री सोनवणे, बंटी नरवाडे उपस्थित होते.

## पान १ वरुन

### लोकसभा अध्यक्षांविरोधात......

काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांची नाराजी - अखिल भारतीय काँग्रेस कमिटी (एआयसीसी) सरचिटणीस के. सी. वेणुगोपाल म्हणाले, 'संसदीय लोकशाहीत विरोधी पक्षनेत्याची एक ठरावीक भूमिका असते आणि ते 'शॅडो पंतप्रधान' म्हणून काम करतात. पण, या संसदेत जेव्हा विरोधी पक्षनेते उभे राहतात, तेव्हा त्यांचा माईक बंद केला जातो. कोणत्याही विरोधी सदस्याला बोलू दिले जात नाही. ही संसद आता एकतर्फी झाली आहे आणि फक्त सत्ताधारी पक्षासाठीच चालवली जात आहे'. सोमवारी लोकसभेत विरोधी पक्षनेते महत्त्वाचे मुद्दे मांडतील यावर सर्व विरोधी पक्षांचे एकमत झाले होते; पण त्यांना एक सेकंदही दिला गेला नाही, असे वेणुगोपाल म्हणाले. ते पुढे म्हणाले, 'वादाच्या माध्यमातून सरकारला उघडे पाडणे ही विरोधी पक्षाची जबाबदारी आहे; पण आम्हाला बोलूच दिले जात नाही'. महिला खासदारांबाबत अध्यक्षांनी केलेल्या वक्तव्यावरही त्यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले. 'अध्यक्षांनी काँग्रेसच्या महिला खासदारांवर अत्यंत गंभीर आरोप केले आहेत. महिला सदस्यांना घाबरून पंतप्रधान संसदेत आले नाहीत, असे अध्यक्ष म्हणाले. खरंच तसं काही होतं का? अध्यक्षांकडे काही पुरावा आहे का, असे प्रश्न त्यांनी उपस्थित केले.

### समृद्धी महामार्गावरील अपघातात......

असून दोघे जखमी झाले होते. त्यानंतरकाही दिवसांपूर्वी याच परिसरात अपघात होऊन कल्याण येथील दोघा तरुणांचा मृत्यू झाला होता.समृद्धी महामार्गावर वाहने येण्यापूर्वी त्यांची तपासणी करण्याचे काम आरटीओचे पथक करीत होते. परंतु आता या वाहनांची तपासणी करताना आरटीओचे पथक दिसून येत नाही. अनेक वाहनांचे टायरही खराब असतात, हवेचा दाब ही कमी असतो, परंतु याची तपासणी होत नसल्याने वाहनचालकांचे फावते आणि अतिवेगामुळे हे अपघात घडतात. समृद्धी महामार्ग झाल्यामुळे प्रवाशांच्या वेळेत बचत झाली आहे. मात्र वेळेपेक्षा वाहनांची वेगमर्यादा जास्त असल्याने अपघाताचे प्रमाणही वाढत आहे. महामार्ग समृद्धी महामार्गावर सुरक्षा नियमांची पायमल्ली सातत्याने होत असल्याचे दिसून येत आहे.

### वर्ल्ड कपमधील महामुकाबल्याचा......

आयसीसी प्रमुख जय शाह यांची कणखर भूमिका - सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, आयसीसी प्रमुख जय शाह यांनी या प्रकरणात अत्यंत कठोर पवित्रा घेतला होता. पीसीबीने भारताविरुद्ध खेळण्यासाठी महसूल वाट्यात वाढ आणि द्विपक्षीय मालिका सुरू करण्याच्या अटी घातल्या होत्या, ज्या जय शाह यांनी स्पष्टपणे फेटाळून लावल्या.

### राजमाता जिजाऊ बस जळगाव......

विशेष विचार करून डिझाइन करण्यात आल्या आहेत. सध्या एसटीच्या अनेक बसेसमध्ये सुमारे ४० प्रवाशांची आसन क्षमता असते. मात्र, या नव्या बसेसमध्ये तब्बल ५५ प्रवासी आरामात बसू शकतील. त्यामुळे आतापर्यंत गर्दीच्या मार्गांवर उभे राहून प्रवास करण्याची वेळ येणाऱ्या प्रवाशांना आता बसून प्रवास करता येणार आहे. एसटीच्या जळगाव विभागालाही जवळपास २०० राजमाता जिजाऊ बसेस टप्याटप्प्याने मिळणार आहेत. आणि या बसेस प्रामुख्याने मुंबई, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर यांसारख्या प्रमुख शहरांना जोडणाऱ्या जास्त गर्दीच्या मार्गांवर चालवण्याचा परिवहन विभागाचा मानस आहे. दररोज मोठ्या प्रमाणावर प्रवासी वर्दळ असलेल्या या मार्गांवर 'राजमाता जिजाऊ' बसेस उपयुक्त ठरण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. एकंदरीत पाहता, 'राजमाता जिजाऊ' या नव्या बसेसच्या समावेशामुळे एसटी महामंडळाने प्रवासी सेवेचा दर्जा उंचावण्याच्या दिशेने ठोस पाऊल टाकले आहे. आधुनिक सुविधांनी सज्ज असलेल्या या बसेस एकीकडे प्रवाशांचा दैनंदिन प्रवास अधिक सोयीस्कर करतील, तर दुसरीकडे महाराष्ट्राच्या इतिहासातील प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वाची आठवण सतत जागी ठेवतील.

### खासदार नारायण राणे......

उधाण आले होते. 'आता आपण किती करणार, यालाही मर्यादा असतात', असे सांगत त्यांनी राजकारणातून निवृत्तीचे संकेत दिल्याची चर्चा झाली होती. याचवेळी त्यांनी आपली दोन्ही मुले कर्तृत्ववान असून त्यांच्या क्षेत्रात यशस्वी असल्याचे नमूद करत, 'नांदा सौख्यभरे', असा आशीर्वादही दिला होता. दरम्यान, स्थानिक नगरपंचायत निवडणुकांमध्ये भाजपाला मिळालेल्या यशानंतर कणकवली येथे नारायण राणे यांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. त्या कार्यक्रमात बोलताना त्यांनी आपण थकल्याची भावना व्यक्त केली होती, ज्यामुळे त्यांच्या राजकीय भवितव्याबाबत विविध तर्कवितर्क लावले जात आहेत.

### गोदा महोत्सवात उत्तर महाराष्ट्रातील......

कुटुंबीयांसह नागरिकांनी या महोत्सवाला भेट देत महिला उद्योजिकांना प्रोत्साहन दिले. या महोत्सवात चार दिवसांत एकूण ८६ लाख ३२ हजार ४१३ रुपयांची उलाढाल झाली असून, ही उलाढाल महिला स्वयंसहायता समूहांसाठी आर्थिकदृष्ट्या अत्यंत लाभदायक ठरली आहे. बचत गटाच्या सर्व महिलांनी महोत्सवाची जबाबदारी पेलली. खरेदी- विक्रीत ऑनलाईन व्यवहाराला प्राधान्य देण्यात आले.

# वाडी प्राथमिक आरोग्य केंद्राला भेट; स्वच्छतेची आयुक्तांकडून पाहणी

प्रतिनिधी । धुळे

आयुक्त नितीन कापडणीस यांनी सद्यस्थितीत स्वच्छतेच्या बाबींना प्राधान्य दिले असून सदर कार्यवाहीत सातत्य व सुधारणा व्हावी यासाठी दैनंदिन प्रत्यक्ष स्थळ पाहणी करण्यात येत आहे.काल राऊळ वाडी येथील प्राथमिक आरोग्य केंद्राला भेट देऊन प्रत्यक्ष परिस्थितीची पाहणी केली तसेच नागरी व रुग्णांना योग्य प्रकारची सेवा देणेबाबत आदेशित केले.

आज शहरातील विविध प्रभागातील भागांची प्रत्यक्ष जागेवर जाऊन स्थळ पाहणी केली. यात देवपूरमधील ओसवालनगर, लाला सरदार नगर, एकवीरादेवी मंदिर परिसर, अमरधाम परिसर, सावरकर पुतळा, जुने धुळे, सुभाष नगर, भिलाटी या परिसरात पाहणी केली. यात रस्त्यावरील बांधकाम साहित्य, वाढलेले गवत, विखुरलेला कचरा याबाबत तातडीने २४ तासाच्या आत कारवाई करण्याचे संबंधित मुकादम व स्वच्छता निरीक्षक यांना आदेशित केले. याप्रसंगी मुख्य स्वच्छ परीक्षक लक्ष्मण पाटील स्वच्छता निरीक्षक प्रमोद चव्हाण, गजानन चौधरी, श्री. अहिरे उपस्थित होते.



**धुळे : येथील आयुक्तांनी अचानक वैद्यकीय आरोग्य विभागाच्या महत्त्वाच्या ठिकाणी पाहणी केली. त्यामध्ये जन्म-मृत्यू कार्यालय, तसेच राहुल वाडी, चितोडरोड कडील महानगरपालिकेचा दवाखाना या ठिकाणी पाहणी केली. व स्वच्छता निरीक्षक यांना तसेच वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांना आवश्यक त्या सूचना दिल्या.**

# अधिकारी, कर्मचारी समस्यांचे निवारण करणार

## • आयुक्त नितीन कापडणीस यांची ग्वाही



प्रतिनिधी । धुळे

**आयुक्त नितीन कापडणीस यांच्या अभिनव संकल्पनेतून धुळे महानगरपालिकेत कार्यरत अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या आस्थापनाविषयक तसेच इतर प्रशासकीय समस्यांचे निराकरण करण्याच्या उद्देशाने दि. १० फेब्रुवारी रोजी सकाळी १०.३० वाजता महानगरपालिका सभागृहात अधिकारी, कर्मचारी समस्या निवारण शिबिर आयोजित करण्यात आले होते.**

या शिबिरात महानगरपालिकेतील विविध विभागांतील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी तसेच सेवानिवृत्त कर्मचारी यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आपल्या समस्या व निवेदने मांडली.

**आयुक्त नितीन कापडणीस यांनी उपस्थित अधिकाऱ्यांना प्राप्त निवेदनांची तातडीने छाननी करून नियमांनुसार योग्य असलेल्या प्रकरणांबाबत कार्यवाही करण्याच्या स्पष्ट सूचना दिल्या. तसेच आस्थापना विभाग प्रमुखांनी सर्व प्राप्त प्रकरणांची नोंद ठेवून टप्प्याटप्प्याने समस्या निवारणासाठी आवश्यक उपाययोजना करण्याचे निर्देश देण्यात आले.**

या शिबिरामध्ये प्रामुख्याने वेतन, वेतनवाढ, पदोन्नती, सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना, आस्थापनाविषयक बाबी तसेच निवासस्थानाशी संबंधित प्रश्न यावर चर्चा करण्यात आली. संबंधित कर्मचाऱ्यांनी लेखी स्वरूपात सादर केलेल्या प्रत्येक निवेदनांचे वाचन करून नोंद घेण्यात आली. सदर शिबिरामुळे अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या समस्यांना थेट व्यासपीठ मिळाल्याने सकारात्मक वातावरण निर्माण झाले असून, भविष्यातही अशा प्रकारची समस्या निवारण शिबिरे आयोजित करण्यात येतील, असे आयुक्तांनी यावेळी स्पष्ट केले. या शिबिराच्या आयोजनाबाबत सेवानिवृत्त कर्मचारी व कार्यरत कर्मचारी यांनी समाधान व्यक्त केले.

# मेहंदी स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

प्रतिनिधी । धुळे

येथील श्री शिवाजी विद्याप्रसारक संस्थेच्या कै. डॉ. पा. रा. घोगरे विज्ञान महाविद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलन कलादर्पण अंतर्गत मेहंदी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थिनींच्या सृजनशीलतेला वाव देणे, कला व परंपरेचे जतन करणे तसेच आत्मविश्वास व स्पर्धात्मक भावना वृद्धिंगत करणे हा या उपक्रमाचा उद्देश होता. मेहंदी स्पर्धेचे उद्घाटन कला मंडळाचे समन्वयक डॉ. एम. व्ही. अमृतसागर यांच्या हस्ते झाले. यावेळी प्राचार्य डॉ. एम. व्ही. पाटील, उपप्राचार्य के. एम. बोरसे, कार्यालयीन अधीक्षक शशिकांत पाटील उपस्थित होते. प्राचार्य डॉ. एम. व्ही. पाटील यांनी मेहंदी स्पर्धेत सर्वाधिक सहभाग नोंदविला गेल्याचे नमूद करत, विद्यार्थिनींनी आपल्या कलेचा उपयोग अर्थार्जनासाठी करावा व ती अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचवावी, असा संदेश दिला. या स्पर्धेसाठी प्रा. मयुरी छाजेड यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. स्पर्धेत एकूण ३५ विद्यार्थिनींनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. यशस्वी आयोजनासाठी डॉ. रूपाली पाटील, प्रा. दीपाली ठाकरे, प्रा. धनवर्षा जोशी, प्रा. प्रियंका शिरसाठ, मिताली परदेशी, मालती याळसे यांनी परिश्रम घेतले. यावेळी प्रा. अनिल पाटील, डॉ. आर. जी. महाल्ले, सुषमा देसले, डॉ. कुमावत, डॉ. अर्चना चौधरी, डॉ. प्रियंका सिसोदे, डॉ. सविता पाटील, डॉ. माधुरी पाटील, प्रा. सायली नंदन, प्रा. सुनीता पवार, प्रा. वर्षा पाटील उपस्थित होते.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक - सागर काशिनाथ ओतारी **(मोबा.- ९९७००५३०६६)** व मालक रेखाबाई काशिनाथ ओतारी यांनी श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स, पी -३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगाव -४२५००१ येथे छापून शॉप नं. ई-१२, चौथा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव- ४२५००१ (महाराष्ट्र), येथे प्रसिद्ध केले.
**✻ कार्यकारी संपादक - किशोर शंकर शिंपी** (✻ पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील) (RNI-MAHMAR/2023/89125) कार्यालय दूरध्वनी क्र. : ०२५७-२२२४०६६, E-Mail : shauryamarathi@gmail.com


# बारावीच्या पहिल्याच पेपरला ४ विद्यार्थी डिबार

## प्राथमिक उपशिक्षणाधिकारी पथकाची धडक कारवाई



प्रतिनिधी । जळगाव

**जिल्ह्यात बारावीची परीक्षा मंगळवारपासून कडेकोट बंदोबस्तात सुरु झाली आहे. पाचोरा वगळता जिल्ह्यात शांततेत परीक्षा पार पडल्या. मात्र, इंग्रजीच्या पहिल्याच पेपरला पाचोरा शहरातील तावरे विद्यालयतील ३ व एम.एम.कॉलेजमधील एक असे चार विद्यार्थ्यांवर कॉपी केसप्रकरणी डिबारची कारवाई केल्याची माहिती समोर आली आहे. प्राथमिक शिक्षण विभागाच्या उपशिक्षणाधिकारी स्वाती हवेले यांच्या पथकाने ही धडक कारवाई केल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.**



जळगाव जिल्ह्यात बारावीची परीक्षा दि. १० फेब्रुवारी ते १८ मार्च या कालावधीत ८२ परीक्षा केंद्रांवर होत असून यासाठी ४५ हजार ११६ विद्यार्थी परीक्षेला परीक्षेला सामोरे जात आहे. त्यापैकी इंग्रजीच्या पहिल्याच पेपरला ४५ हजार ११६ विद्यार्थ्यांपैकी ४४ हजार ४३२ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली तर ६८४ विद्यार्थ्यांनी दांडी मारली आहे. कॉपीमुक्त परीक्षा सुनिश्चित करण्यासाठी सर्व परीक्षा केंद्रांवर सीसीटीव्ही यंत्रणा अनिवार्य करण्यात आले असून, प्रश्नपत्रिकेच्या वाहतुकीसाठी पोलीस बंदोबस्त, परीक्षा केंद्रांच्या ५०० मीटर परिसरातील झेरॉक्स दुकाने बंद ठेवणे, तसेच ५० मीटर परिसरात अनधिकृत व्यक्तींना प्रवेशबंदी करण्यात आली होती.

### संवेदनशील केंद्रांवर बैठे पथक

संवेदनशील केंद्रांवर बैठे व फिरते पथके, ड्रोन कॅमेरे व व्हिडिओग्राफीद्वारे विशेष लक्ष ठेवण्यात आले. कॉपीमुक्त परीक्षा राबविण्यासाठी जिल्हाभरात झूम ॲपद्वारे नियंत्रण ठेवण्यासाठी प्रत्येक वर्गामध्ये झूमद्वारे व्हिडिओ चित्रीकरण करण्यात आले. जिल्ह्यातील सर्वच परीक्षा केंद्रांवर विद्यालयाच्या परिसरात चोख पोलीस बंदोबस्त तैनात केला होता.



# समस्या जाणून घेत आदर्श प्रभाग बनवण्यासाठी कटिबद्ध : महापौर



प्रतिनिधी । जळगाव

**महापालिका निवडणुकीत निवडून आल्यानंतर केवळ खुर्चीवर बसून राहण्यापेक्षा, प्रत्यक्ष मैदानात उतरून जनतेच्या समस्या जाणून घेणे ही माझी प्राथमिकता आहे. म्हणूनच आज मी आपल्या प्रभागात उपस्थित आहे. नगरसेवक आणि प्रशासन यांच्यात योग्य समन्वय ठेवून, निधीचा वापर करत या प्रभागाला आदर्श प्रभाग बनवण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. महापालिकेची दारे नागरिकांसाठी सदैव उघडी असून तुमच्या सूचनांचे नेहमीच स्वागत असेल, असे प्रतिपादन महापौर दीपमाला काळे यांनी केले.**

शहरातील छत्रपती शिवाजीनगर भागातील इंद्रप्रस्थ नगर येथे संत श्री गजानन महाराज यांच्या प्रगट दिनानिमित्त भक्तीमय वातावरणात सोहळा साजरा करण्यात आला. यावेळी जळगावचे नवनिर्वाचित महापौर दीपमाला काळे आणि उपमहापौर मनोज चौधरी यांच्या हस्ते श्रींची महाआरती आणि पालखी पूजन करण्यात आले.

हा सोहळा यशस्वी करण्यासाठी संस्थेचे अध्यक्ष संतोष चव्हाण, उपाध्यक्ष प्रवीण पाटील, सचिव गणेश शेळके यांच्यासह योगेंद्र पवार, नरेंद्र पाटील, मनोज कपाटे, राहुल पाथरवट, राजेश पाटील, डॉ. सोपान पाटील, सतीश भोसले, वैभव जैन, हर्षा भोसले, छाया पाटील, प्रिया थोरवे, सुरेखा चव्हाण, वैशाली पाटील, राजेंद्र बडगुजर, सतीश वाणी, प्रकाश शेवाळे यांच्यासह अनेक भाविक आणि स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले.

➢ उपमहापौर मनोज चौधरी यांनीही यावेळी आपले मनोगत व्यक्त करत शहर विकासाचा संकल्प बोलून दाखवला. या सोहळ्यात योगीराज श्री गजानन महाराज बहुद्देशीय संस्थेच्यावतीने नवनिर्वाचित महापौर, उपमहापौर व मान्यवरांचा केशर बाग आणि इंद्रप्रस्थनगर पंचक्रोशीतील नागरिकांच्या उपस्थितीत भव्य सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाला प्रभाग ९ मधील नगरसेविका संगीता दांडेकर, नगरसेवक ॲड. दिलीप पोकळे, जिल्हा सरकारी वकील सुरेंद्र काबरा, मनोज काळे आदींची उपस्थिती होती.

## थोडक्यात

### १ एप्रिलनंतर नजराणा दर वाढणार

**जळगाव ।** महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाच्या ४ मार्च २०२५ रोजीच्या अधिसूचनेनुसार महाराष्ट्र जमीन महसूल (भोगवटादार वर्ग २ व भाडेपट्ट्याने धारण केलेल्या जमिनी भोगवटादार वर्ग १ मध्ये रूपांतर) नियम, २०२५ अंमलात आले आहेत. या नियमांनुसार, भोगवटादार वर्ग-२ किंवा भाडेपट्ट्याने धारण केलेल्या शासकीय जमिनीचा मूळ मंजूर प्रयोजनासाठी किमान ५ वर्षे प्रत्यक्ष वापर पूर्ण झाल्यानंतर जमीन वर्ग-१ मध्ये रूपांतरणासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात अर्ज करता येणार आहे. ३१ डिसेंबर २०२५ नंतर लागू असलेल्या अधिमूल्य दरानुसार कृषी प्रयोजनासाठी ग्रामपंचायत, नगरपालिका हद्दीबाहेरील जमिनींसाठी ASR दराच्या ७५ टक्के तर निवासी, वाणिज्यिक व औद्योगिक प्रयोजनासाठी ASR किमतीच्या ६० ते ७५ टक्के दर लागू राहणार आहेत. तसेच नगरपंचायत, नगरपालिका, महानगरपालिका व विशेष नियोजन प्राधिकरण हद्दीतील जमिनींसाठीही ASR दरानुसार अधिमूल्य निश्चित करण्यात आले आहे.

# दारूच्या नशेत तरुणावर लोखंडी पट्टीने हल्ला

प्रतिनिधी । जळगाव

**तालुक्यातील आव्हाणे येथे दारूच्या नशेत एका तरुणाने किरकोळ कारणावरून दुसऱ्या तरुणाला बेदम मारहाण केल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी जळगाव तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.**

फिर्यादी प्रदीप घनश्याम पाटील (वय २५, रा. आव्हाणे) हे दि.८ फेब्रुवारी रोजी रात्री ८ वाजेच्या सुमारास गावातील मारुती मंदिराजवळील चहाच्या टपरीसमोर उभे होते. यावेळी आरोपी नितीन उर्फ पपई जगन पाटील (रा. आव्हाणे) हा दारूच्या नशेत त्या ठिकाणी आला. त्याने कोणत्याही कारणाशिवाय प्रदीप यांना शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. वादाचे रूपांतर हाणामारीत झाले. आरोपी नितीनने प्रदीप यांना हातापायांनी मारहाण केली आणि त्यानंतर त्याच्या हातातील लोखंडी पट्टीने प्रदीप यांच्या डोक्यावर, छातीवर आणि उजव्या हातावर गंभीर इजा केली. तुला जास्त झाले आहे, आता तुझा कार्यक्रमच लावतो, अशी जीवे मारण्याची धमकीही आरोपीने यावेळी दिली. या झटापटीत फिर्यादीचा मोबाईल पडून त्याचे नुकसान झाले आहे. या प्रकरणी प्रदीप पाटील यांनी दि.९ फेब्रुवारी रोजी पहाटे १:४० वाजता जळगाव तालुका पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार नोंदवली. पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. जळगाव तालुका पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक शशिकांत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक शामकुमार मोरे तपास करत आहेत. आरोपी नितीन पाटील हा फरार आहे.

# अंनिसच्या शाखा कार्याध्यक्षपदी मीनाक्षी चौधरी, सचिवपदी हेमंत सोनवणे

प्रतिनिधी । जळगाव

**येथील महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या जळगाव शहर शाखेच्या नवीन कार्यकारिणीची निवड एकमताने करण्यात आली आहे. यात शाखा कार्याध्यक्षपदी मीनाक्षी विश्वजीत चौधरी यांची निवड झाली. तर प्रधान सचिवपदी हेमंत रघुनाथ सोनवणे याची फेरनिवड करण्यात आली आहे.**

जळगाव शहर शाखेची बैठक नुकतीच जिल्हा कार्यालयात घेण्यात आली. यावेळी मार्गदर्शक म्हणून राज्याचे पदाधिकारी प्रा. डी.एस.कट्यारे तर निरीक्षक म्हणून राज्य पदाधिकारी विश्वजीत चौधरी उपस्थित होते.





सुरुवातीला विविध उपक्रम घेण्याविषयी चर्चा झाली. यात राष्ट्रीय विज्ञान दिन, छत्रपती शिवाजी महाराज जयंती उपक्रम घेण्याविषयी प्राथमिक नियोजन करण्यात आले. यानंतर कार्यकारिणीची एकमताने निवड झाली. यावेळी प्रा. कट्यारे यांनी, मीनाक्षी चौधरी यांची शाखा कार्याध्यक्ष म्हणून नाव सुचविले. त्यानुसार, मानसिक आरोग्य व्यवस्थापन प्रकल्प विभागाचे जिल्हा कार्यवाह मीनाक्षी चौधरी यांनी संघटनेच्या एक व्यक्ती, एक पद धोरणानुसार जिल्ह्याचे पद सोडून शहर शाखेचे कार्याध्यक्षपद सर्वानुमते स्विकारले. याशिवाय अध्यक्षपदी यशवंत बारी, उपाध्यक्ष म्हणून अजित चौधरी, प्रधान सचिव म्हणून हेमंत सोनवणे यांची फेरनिवड झाली. याशिवाय इतर कार्यकारिणीत वैज्ञानिक जाणिवा प्रकल्प म्हणून आनंद ढिवरे, युवा सहभाग कार्यवाह गुरुप्रसाद पाटील, महिला सहभाग कार्यवाह प्रा. डॉ. कल्पना दिलीप भारंबे तर बुवाबाजी संघर्ष विभाग कार्यवाह म्हणून जितेंद्र बाबुलाल धनगर यांची निवड झाली. बैठकीला ॲड. भरत गुजर, अजय जाधव, विलासराव देशमुख, प्रमोद पाटील आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

# पोलिसांच्या १७१ जागांसाठी १२ हजार स्पर्धक

प्रतिनिधी । जळगाव

**पोलिस शिपाई पदाच्या १७१ जागांसाठी सुमारे १२ हजार उमेदवारांनी अर्ज भरले आहे. दि. ११ फेब्रुवारीपासून शारीरिक मोजमाप व मैदानी चाचणीला सुरूवात होत आहे. त्याकरिता पोलिस बंदोबस्ताचेही नियोजन करण्यात आले असून भरती प्रक्रियेमध्ये ज्या पोलिस अधिकारी, कर्मचाऱ्यांचे पाल्य अथवा नातेवाईक आहे, अशा अधिकारी, कर्मचाऱ्यांना बंदोबस्तासाठी तैनात केले जाणार नसल्याची माहिती पोलीस अधीक्षक डॉ. महेश्वर रेड्डी यांनी दिली.**

जिल्हा पोलिस दलाच्या आस्थापनेवर सन २०२४-२०२५ या कालावधीत पोलिस शिपाई संवर्गातील रिक्त एकूण १७१ पदे भरण्यासाठी भरती प्रक्रिया राबविली जात आहे. इच्छुक आणि पात्र उमेदवारांकडून या पदांसाठी १२ हजार अर्ज दाखल झाले आहेत. या भरती प्रक्रियेतील मैदानी चाचणीचा टप्पा दि. २० जानेवारीपासून सुरू होणार होता. मात्र काही जिल्ह्यांमध्ये जि.प. निवडणुकीची आचारसंहिता लागल्याने मैदानी चाचणी पुढे ढकलण्यात आली होती. आता जि.प. निवडणुका झाल्या आहे. त्यामुळे निवडणुकांच्या बंदोबस्ताचाही ताण कमी होणार असल्याने पोलिस भरती प्रक्रियेसाठी मैदानी चाचणी दि ११ फेब्रुवारीपासून सुरू होणार आहे. शारीरिक मोजमाप व मैदानी चाचणीसाठी जिल्हा पोलिस दलाच्यावतीने बंदोबस्ताचेही नियोजन करण्यात आले. पोलिस भरती प्रक्रियेसाठी कोणताही गैरप्रकार होऊ नये, म्हणून व्हिडिओ ग्राफरचीही नजर राहणार आहे. त्यासाठी ३८ व्हिडिओ ग्राफर तैनात केले जाणार असून प्रत्येक घडामोडींचे चित्रण केले जाईल. तसेच पोलीस भरतीच्या ठिकाणी मोबाईल आणण्यास बंदी घातली आहे. पोलिस भरतीसाठी जिल्ह्यातील प्रत्येक पोलिस ठाण्यांसह मुख्यालय, नियंत्रण कक्ष, शहर वाहतूक शाखा, आर्थिक गुन्हे शाखा, एलसीबी, जिल्हा विशेष शाखा, डायल ११२, वेलफेअर, एएचटीयू, संगणक कक्ष अशा विविध शाखांकडून बंदोबस्त मागविला आहे.

# भिरूड परिवारातर्फे संत गजानन महाराज यांचा प्रगटदिन उत्साहात

प्रतिनिधी । जळगाव

**येथील भिरूड परिवारातर्फे शेगाव निवासी श्री संत गजानन महाराज यांच्या प्रगटदिनानिमित्त धार्मिक कार्यक्रम उत्साहात पार पडला. डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालय परिसरातील निवासी संकुलात या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.**



कार्यक्रमाच्या सुरूवातीला रूग्णालयाचे प्रशासन अधिकारी आशिष भिरूड व मंजुषा भिरूड, माजी खासदार डॉ. उल्हास पाटील, फाउंडेशनच्या सचिव डॉ. वर्षा पाटील, रजिस्ट्रार प्रमोद व ज्योत्स्ना भिरूड, लेखापाल योगेश व नूतन पाटील, विकास व संगीता बेंडाळे, किशोर व किर्ती झांबरे, एन.जी.चौधरी व स्मिता चौधरी, गोपाळ व सौ. भोळे या दाम्पत्यांच्या हस्ते संत गजानन महाराज यांची महाआरती करण्यात आली.

यावेळी प्रख्यात हृदयविकार तज्ज्ञ डॉ. वैभव पाटील, जगन्नाथ भिरूड यांच्यासह परिसरातील रहिवासी उपस्थित होते. याप्रसंगी संत गजानन महाराज यांचे भजनगीत सादर करण्यात आले. तसेच भाविकांनी पिठलं, भाकरी प्रसादाचा लाभ घेतला. यशस्वीतेसाठी भाविकांनी परिश्रम घेतले.

# सामाजिक न्याय, समतेसाठी महिलांनी एकत्र येणे गरजेचे

## मंगल मैत्री ग्रुपतर्फे रमाई जयंतीप्रसंगी नगरसेविका डॉ.अमृता सोनवणे यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी । जळगाव

**महिलांनी आत्मसन्मानाने जगावे, शिक्षणाच्या माध्यमातून स्वत:चे आयुष्य घडवावे आणि अन्यायाविरुद्ध आवाज उठवावा, हा माता रमाई आंबेडकर यांचा विचार आजही तितकाच प्रेरणादायी आहे. सद्यस्थितीत महिलांचे सक्षमीकरण, सामाजिक न्याय व समतेसाठी सर्वांनी एकत्र येणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन या कार्यक्रमाचे उद्घाटक नगरसेविका डॉ. अमृता सोनवणे यांनी केले.**



हरीविठ्ठलनगर येथील मंगल मैत्री ग्रुपच्यावतीने माता रमाई आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन सभा व मिरवणूक या विशेष कार्यक्रमाचे आयोजन केले होते. प्रारंभी हरीविठ्ठलनगर येथील बाजारपेठेतील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास व माता रमाई आंबेडकर यांच्या प्रतिमेला उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन व दीपप्रज्वलन करण्यात आले. त्यानंतर उपस्थितांनी त्रिशरण, पंचशील ग्रहण केले. या कार्यक्रमास मानवी हक्क संरक्षण व जागृती संघटनेचे जिल्हाध्यक्ष अमोल कोल्हे अध्यक्षस्थानी होते. कार्यक्रमाच्या उद्घाटक म्हणून नवनिर्वाचित नगरसेविका डॉ. अमृता सोनवणे उपस्थित होत्या. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून कैलास हटकर, भारत सोनवणे यांची उपस्थिती होती. अध्यक्षीय भाषणात अमोल कोल्हे यांनी माता रमाई आंबेडकर यांचे सामाजिक कार्य, त्यांचे संघर्षमय जीवन तसेच डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या चळवळीतील त्यांचे मोलाचे योगदान यावर प्रकाश टाकला. यानंतर डॉ. अमृता सोनवणे यांच्या हस्ते मिरवणुकीस झेंडा दाखवून मिरवणुकीचे उद्घाटन करण्यात आले. तसेच पुष्पांनी सुशोभित केलेल्या घोडागाडीत विराजमान असलेल्या माता रमाई आंबेडकर यांच्या भव्य प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यासह उद्घाटकांच्या हस्ते केक कापून उपस्थित महिलांनी एकमेकींना केक भरवून आनंद व्यक्त केला. ही मिरवणूक हरीविठ्ठलनगर बाजारपेठ येथून राजीव गांधी नगर, वाघ नगर स्टॉप मार्गे शिवतीर्थ येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्मारकास अभिवादन करून पुढे चित्रा चौक, टॉवर चौक, नेहरू चौक मार्गे रेल्वे स्टेशनजवळील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळ समाप्त करण्यात आली. सूत्रसंचालन प्रा.प्रितीलाल पवार यांनी केले. आभार विद्या झनके यांनी मानले. यशस्वीतेसाठी शोभा इंगळे, उषा इंगळे, प्रमिला इंगळे, उषा तायडे, विद्या झनके, उज्वला सपकाळे, शैला पारधे, शोभा पातुडे, छाया इंगळे, आकाश तायडे, आकाश झिने, माँ शक्ती फाउंडेशनच्या अध्यक्षा आशा अंभोरे, शुभांगी बिऱ्हाडे यांच्यासह मंगल मैत्री ग्रुप व परिवर्तन ग्रुपच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# विद्यार्थ्यांच्या किल्ला प्रदर्शनाने पालकांची मने जिंकली; पालक-शिक्षक संघाची सभा यशस्वी

प्रतिनिधी । जळगाव

**संत ज्ञानेश्वर प्राथमिक व माध्यमिक विद्यालयात १० फेब्रुवारी रोजी पालक-शिक्षक संघाची सभा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. सभेला पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.**



विद्यार्थ्यांनी शिवजयंतीनिमित्त तयार केलेल्या विविध ऐतिहासिक किल्ल्यांच्या प्रतिकृतींचे आकर्षक प्रात्यक्षिक प्रदर्शन आयोजित केले होते. राजगडसारख्या किल्ल्यांच्या सुंदर मॉडेल्सनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

इयत्ता सहावीतील विद्यार्थी राज दांडगे, अमित तडवी, कन्हैया संदीप पाटील, समर्थ जाधव, यश घोडेराव, शिवम गोसावी, नैतिक पाटील, मानव निंबाळकर, निशांत मोहरकर, हिमांशू मोहरकर, महेश जाधव, कार्तिक गोंधळी, हार्दिक पाटील, वेदांत खराटे व नैतिक मिस्त्री यांनी किल्ल्यांची उत्कृष्ट निर्मिती करून विशेष लक्ष वेधले.

# ग्रामसेवक प्रोसेडिंग बुक घेऊन फरार

## जिल्हा परिषदेत उपसरपंच व सदस्यांचा ठिय्या

प्रतिनिधी । जळगाव

**तालुक्यातील कानळदा ग्रामपंचायतीत मासिक सभेदरम्यान घडलेल्या धक्कादायक प्रकारामुळे एकच खळबळ उडाली आहे. ग्रामसेवकाने थेट प्रोसेडिंग बुक घेऊन सभेतून पलायन केल्याचा गंभीर आरोप ग्रामपंचायत सदस्य व उपसरपंचांनी केला आहे. या घटनेमुळे ग्रामपंचायतीतील कारभारावर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.**



कानळदा ग्रामपंचायतीच्या मासिक सभेत ग्रामसेवक रघुनाथ चव्हाण यांनी कोणतीही पूर्वसूचना किंवा सभासदांची संमती न घेता प्रोसेडिंग बुक ताब्यात घेऊन सभास्थळावरून निघून गेल्याचा आरोप करण्यात आला आहे. सभेदरम्यान अचानक घडलेल्या या प्रकारामुळे उपस्थित सदस्यांमध्ये गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते. ग्रामपंचायतीत कोट्यवधी रुपयांचे आर्थिक व्यवहार सुरू असून, त्यामध्ये मोठ्याप्रमाणावर भ्रष्टाचार होत असल्याचा संशयही यानिमित्ताने व्यक्त केला जात आहे. या पार्श्वभूमीवर ग्रामसेवकाने कोरे प्रोसेडिंग बुकवर ग्रामपंचायत सदस्य व उपसरपंचांच्या सह्या घेऊन त्याचा गैरवापर केल्याचा आरोप करण्यात येत आहे. सभेअंती प्रोसेडिंग बुकसह ग्रामपंचायत कार्यालयातून ग्रामसेवक फरार झाल्याचे समजताच सदस्यांनी तीव्र संताप व्यक्त केला. या प्रकारामुळे आपली फसवणूक झाल्याचा आरोप करत सदस्यांनी तात्काळ कारवाईची मागणी लावून धरली आहे.

या गंभीर प्रकरणाची दखल घेण्यासाठी ग्रामपंचायतीच्या उपसरपंचांसह महिला सदस्य व इतर सभासदांनी थेट जिल्हा परिषद गाठली. त्यांनी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या दालनात ठिय्या देत संबंधित ग्रामसेवकावर कठोर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली. यावेळी सदस्यांनी, प्रोसेडिंग बुक हे सभेसमोर सादर करूनच गावाच्या हिताचे निर्णय नोंदवले जावेत, अशी ठाम भूमिका मांडली. संतप्त सदस्यांनी मासिक सभा अर्धवट सोडून प्रोसेडिंग बुक घेऊन जाणे हे अत्यंत संशयास्पद व नियमबाह्य असल्याचा आरोप केला. अशा प्रकारामुळे गावच्या विकास प्रक्रियेलाच धक्का बसत असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

# वरणगावच्या प्रभाग क्र.१० मध्ये शिवसेना नगरसेवकांच्या पुढाकाराने झाली नाले साफसफाई



प्रतिनिधी । वरणगाव

**येथील प्रभाग क्रमांक १० मधील गणपती नगर, जालंधर नगर, हनुमान नगर या भागात काटेरी झुडपे आणि नाल्यांची साफसफाई शिवसेनेच्या तिन्ही नगरसेवकांनी करून घेतल्याने प्रभागातील नागरिकांनी या नगरसेवकांनी तत्परता दाखविल्यामुळे त्यांचे कौतुक केले आहे.**

शहरातील प्रभाग क्रमांक १० हा भाग सर्वात मोठा परिसर म्हणून ओळखला जातो. या भागाचा मोठा विस्तार झालेला आहे. या भागात गणपती नगर, जालंधर नगर, सिद्धेश्वर नगर, हनुमान नगर हा भाग येतो. या भागात मोठ्याप्रमाणावर काटेरी झाडे झुडपे वाढले होते. तसेच गटारी नालेसफाई झालेली नव्हती. यामुळे नागरिकांनी शिवसेनेच्या नगरसेविका तृप्ता महाजन, विनोद झोपे, माला मेढे यांना या समस्या सांगितल्या. त्यांनी तत्काळ याची दखल घेऊन नगरपरिषद सफाई कर्मचाऱ्यांना बोलावून प्रभागात वाढलेली काटेरी झुडपे, नाले सफाई स्वत: दिवसभर उभे राहून सफाई करून घेतली. यामुळे शिवसेनेच्या नगरसेविका तृप्ता महाजन, विनोद झोपे आणि माला मेढे यांचे प्रभागातील नाले साफसफाई आणि काटेरी झुडपे काढल्यामुळे नागरिकांनी कौतुक केले आहे.

## थोडक्यात

### घरासमोर शेजाऱ्यांकडून मारहाण

**भुसावळ ।** मुस्लीम कॉलनीतील रहिवासी वहिदा शेख (वय २९) व तिचा पती शेख वसिम यांनी दि ५ फेब्रुवारी रोजी पोलीस ठाण्यात शेजाऱ्यांविरुद्ध गंभीर तक्रार दाखल केली. महिलेने दिलेल्या माहितीनुसार, तिच्या घरासमोर शेजारी शेख शफी, शेख साबीर, शेख सैफु, सैफुची आजी व शेख बबलु यांनी दुपारी व संध्याकाळी वेगवेगळ्या वेळेस शिवीगाळ केली व तिच्या पतीवर लाथा-बुक्यांनी हल्ला केला. त्यावेळी तिला हातात विटा घेऊन मारण्याचा प्रयत्न केला. वादाचे मूळ कारण घरासमोरील बाथरुमचा पाईप न लावल्यास शेजाऱ्याने धमकी दिली होती.

### गजानन महाराज प्रगट दिन साजरा

**भुसावळ ।** येथील जामनेर रोडवरील श्री गजानन महाराज देवस्थानतर्फे दि.८ रोजी श्री संत गजानन महाराज यांच्या १४८ व्या प्रगट दिनानिमित्त सामूहिक श्री गजानन विजय ग्रंथाचे पारायणासह विविध कार्यक्रम उत्साहात पार पडले. प्रतिवर्षाप्रमाणे यावर्षीही प्रगटदिनानिमित्त प्रारंभी श्रींचे स्नान अभिषेक महापूजा सकाळी ५.३० झाली. दुपारी महाप्रसाद सकाळपासून सेवेकरी सेवा देत होते.

# मराठी साहित्य विश्वात दोन नव्या काव्यसंग्रहांची भर

प्रतिनिधी । रावेर

मराठी साहित्याच्या दालनात दोन दर्जेदार काव्यसंग्रहांची भर पडली आहे. शिक्षण विकास मंडळ विवरे संचलित ग. गो. बेंडाळे हायस्कूल, विवरे येथे दि. ९ फेब्रुवारी रोजी शाळेच्या उपशिक्षिका श्रीमती सुनिता सुरवाडे उर्फ विजय सुता लिखीत मराठी साहित्याच्या दालनात दोन दर्जेदार काव्यसंग्रहांची भर पडली आहे. शिक्षण विकास



मंडळ विवरे संचलित ग. गो. बेंडाळे हायस्कूल, विवरे येथे दि. ९ फेब्रुवारी रोजी शाळेच्या उपशिक्षिका श्रीमती सुनिता सुरवाडे उर्फ विजय सुता यांच्या 'मूक सावलीची साथ' व 'भावना एक सागर' या काव्यसंग्रहांचा भव्य प्रकाशन सोहळा उत्साहात पार पडला. या प्रकाशन सोहळ्यास साहित्य, शिक्षण व सांस्कृतिक क्षेत्रातील अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी खासदार व गोदावरी फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. उल्हास पाटील तर रावेर शिक्षण संवर्धक संघाचे उपाध्यक्ष डॉ. राजेंद्र आठवले यांच्या शुभहस्ते काव्यसंग्रहांचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून किरण प्रकाश आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी रमाबाई आंबेडकर, राजमाता जिजाऊ, सावित्रीबाई फुले यांचे प्रतिमा पूजन करण्यात आले होते.

# हॅपी जर्नी चित्र आऊटस्टँडिंग परफॉर्मन्स अवॉर्डने कलाशिक्षक कमलेश गायकवाड सन्मानित

प्रतिनिधी । चोपडा

**आसाम येथील सुप्रसिद्ध यु.एस.आर्ट गॅलरीतर्फे कलाश्री मेगा नॅशनल आर्ट एक्झिबिशन २०२६ चे आयोजन करण्यात आले होते. या राष्ट्रीय चित्रकला स्पर्धेत भारतातून विविध चित्रकारांनी सहभाग नोंदविला. त्यात प्रताप विद्यामंदिरातील कलाशिक्षक, चित्रकार कमलेश अशोक गायकवाड यांनी वॉटर कलरच्या माध्यमातून चितारलेले हॅप्पी जर्नी या निसर्गचित्राला आऊटस्टँडिंग परफॉर्मन्स हा सन्मान मिळाला.**



या चित्राचे वैशिष्ट्य म्हणजे त्रिमितीचा आभास, वास्तववादी चित्रशैली, वातावरणातील गारवा, आनंद, उत्साह,जलरंगातील निर्माण केलेला स्वप्नमय आभास, आकाशाचे अप्रतिम प्रतिबिंब, गगनात विहार करणारे मुक्त आनंदमय पक्षी, चित्रातील गतिमान मानवाकृती, एकंदरीत चित्रातील वातावरण मानवी मनाचा वेध घेते.

त्यांच्या या चित्राला आकर्षक स्मृतिचिन्ह, सन्मानपत्र कलाशिक्षक, चित्रकार कमलेश गायकवाड यांना प्राप्त झाले.या नावीन्यपूर्ण यशाबद्दल संस्थेचे चेअरमन राजाभाई मयूर, अध्यक्ष शैलाबेन मयूर, उपाध्यक्ष विश्वनाथ अग्रवाल, सचिव माधुरी मयूर, चंद्रहासभाई गुजराथी, भूपेंद्रभाई गुजराथी, संस्था समन्वयकगोविंद गुजराथी, डी.टी.महाजन, मुख्याध्यापक प्रशांत गुजराथी, उपमुख्याध्यापक श्रीमती. एम. डब्ल्यू पाटील, उपप्राचार्य जे.एस.शेलार, पर्यवेक्षक अतुल भट, पंकज नागपुरे, एस.व्ही. करमरकर यांनी शुभेच्छा दिल्या. तसेच जळगाव जिल्हा कलाध्यापक संघ, चोपडा तालुका कलाध्यापक संघ, विविध शैक्षणिक संघटना, सामाजिक संघटना यांनीही चित्रकार ,कवी, कलाशिक्षक कमलेश गायकवाड यांना भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. स्केचिंग, रंगोली आर्ट, अक्षरलेखन, वॉटर कलर, निसर्गचित्र, व्यक्तिचित्र , फलक लेखन- रेखन यांसारख्या कला प्रकारांवर प्रभुत्व असणारे, नाविन्यपूर्ण, उपक्रमशील, विद्यार्थीप्रिय, शिस्तप्रिय, कवी मनाचे कलाशिक्षक कमलेश गायकवाड यांना यापूर्वी आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय पुरस्कार, भारत सरकार गृह मंत्रालय - सशस्त्र सीमा बल ( एस. एस. बी.) , भारत सरकार निवडणूक आयोग, राष्ट्रीय कला संस्था, जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा पोलीस दल, यांसारख्या विविध शैक्षणिक, सामाजिक संस्था, संघटनांकडून प्रशंसापत्र, गौरवपत्र, पुरस्कार प्राप्त झालेले आहेत. शैक्षणिक व सामाजिक स्तरातून त्यांचे विशेष कौतुक होत आहे.

# चोपडा महाविद्यालयात सूक्ष्मजीवशास्त्र विभागातर्फे हँड्स ऑन ट्रेनिंगचे आयोजन

प्रतिनिधी । चोपडा

येथील दादासाहेब डॉ.सुरेश जी.पाटील महाविद्यालयात सूक्ष्मजीवशास्त्र विभाग व प्रोजीनोम लाईफ सायन्स छ.संभाजीनगर यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला.



याचाच एक भाग म्हणून हँड्स ऑन ट्रेनिंगचे आयोजन पदवी व पदव्युत्तर वर्गातील विद्यार्थ्यांसाठी करण्यात आले होते. यासाठी ट्रेनर म्हणून छ.संभाजीनगर येथून प्रोजीनोम लाईफ सायन्सचे डायरेक्टर डॉ. विपीन हिरेमठ हे लाभले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य प्रा. डॉ. के. एन. सोनवणे हे होते. तसेच उपप्राचार्य प्रा.डॉ.आर. एम. बागुल उपस्थित होते. प्र. प्राचार्य प्रा.डॉ.के.एन. सोनवणे यांनी यावेळी मोलाचे मार्गदर्शन केले.

प्रा. डॉ.आर.एम.बागुल यांनी आजच्या काळात विद्यार्थी कौशल्याधिष्ठीत बनणे खूप महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन केले. पहिल्या सत्रात पाहुण्यांनी विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या माल्युकूलर टेक्निक बद्दल माहिती दिली. तसेच दुसऱ्या सत्रात विद्यार्थ्यांनी स्वत: हे प्रात्यक्षिक केले. जाहिद मनियार, स्विटी निकम,ा माधुरी पाटील, कल्याणी शिरसाठ आदी शिक्षक यावेळी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार वसिम पटेल यांनी मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी महेंद्र क्षिरसागर व यतीन पाटील यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# भुसावळ तालुक्यात शिव संपर्क अभियानाला सुरुवात



प्रतिनिधी । वरणगाव

भुसावळ तालुक्यातील ग्रामीण भागात शिवसेनेतर्फे उपमुख्यमंत्री तथा शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथ शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त शिवसंपर्क अभियान या उपक्रमाचा शुभारंभ जिल्हाप्रमुख समाधान महाजन यांच्या उपस्थितीत फुलगाव येथून सोमवार ९ फेब्रुवारी रोजी सायंकाळी करण्यात आला.

आगामी होऊ घातलेल्या जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणूक डोळ्यासमोर ठेऊन शिवसेनेचा भगवा ग्रामीण भागात गावागावात आणि घराघरात पोहोचवा हा उद्देश ठेवून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून या शिवसंपर्क अभियानाची सुरवात केल्याचे जिल्हाप्रमुख समाधान महाजन यांनी यावेळी सांगितले. तसेच जिल्हा परिषद आणि पंचायत समितीचे शिवसेचे संभाव्य उमेदवार यांच्या आणि ग्रामीण भागातील ज्येष्ठश्रेष्ठ नागरिकांच्या भेटीगाठी घेण्यात आल्या. यावेळी जिल्हाप्रमुख समाधान महाजन, जेष्ठ शिवसैनिक विलास मुळे, तालुका समन्वयक सुभाष चौधरी, शिवसेनेचे नगरसेवक राजेंद्र चौधरी, पुलगावचे सरपंच शाम फुलगावकर, ग्रामपंचायत सदस्य सचिन पाटील, गणेश झोपे यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी व फुलगाव येथील ग्रामस्थ कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वरणगावला दिव्यांग संस्थेतर्फे ई-श्रम कार्ड वितरण

- ३०० दिव्यांग बांधवांसह नागरिकांना कार्ड मिळाल्याचे समाधान

प्रतिनिधी । वरणगाव

**येथील एकता दिव्यांग बहुउद्देशीय संस्था यांच्या वतीने सोमवारी जुने भाजी मार्केट, विठ्ठल मंदिर जवळ हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.**




या कार्यक्रमामध्ये दिव्यांग तसेच शहरातील बांधवांना एन.एम.पी. पुणे, टाटा ए.आय.जी. तसेच स्वस्ती फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने ई-श्रम कार्ड व आयुष्मान कार्ड मोफत काढून देण्यात आले. या उपक्रमाचा दिव्यांगसह सुमारे ३०० ते ४०० नागरिकांनी लाभ घेतला. दिव्यांग साहित्य वाटपाचा कार्यक्रम नियोजित होता. परंतु मुंबई येथील मान्यवर काही कारणास्तव उपस्थित राहू न शकल्यामुळे संस्थेने साहित्य वाटप न करण्याचा निर्णय यावेळी घेतला. या कार्यक्रमाचे वरणगाव येथील एकता दिव्यांग बहुउद्देशीय संस्था अध्यक्ष सुनील शेटे, रफीक शेख सांडु, विजय चौधरी, सुखराम माळी, रेहमान शाह, सुनील पाटील, संतोष पाटील, रामा शिवरामे, बालु सैतवाल, आर्यन परदेशी, संतोष देशमुख, अनिल इंगळे, आनंदा झांबरे, अविनाश पाटील, नमन माळी , दर्शन माळी, विद्या सोनार, सुजाता भोई, योगिता खडसे, साधना जांभुरे यांच्यासह अनेकांनी परिश्रम घेतले.

# महिनाभरापासून पाणीपुरवठा खंडित; तळेगाव ग्रामपंचायत कार्यालयाला ठोकले टाळे!

## पाण्यासाठी तळेगावच्या रणरागिणी आक्रमक, घाणीचे साम्राज्य, अस्वच्छतेमुळे ग्रामस्थ संतप्त

प्रतिनिधी । चाळीसगाव

तालुक्यातील तळेगाव येथे पिण्याच्या पाण्याच्या भीषण टंचाईमुळे त्रस्त झालेल्या महिलांचा संयम अखेर सुटला. गेल्या महिनाभरापासून नळांना पाणी न आल्याने संतप्त महिलांनी थेट ग्रामपंचायत कार्यालयावर धडक देत कार्यालयाला टाळे ठोकून जोरदार निदर्शने केली. प्रशासनाच्या आडमुठ्या धोरणामुळे आणि दुर्लक्षामुळे गावकरी संतप्त झाले आहेत. जोपर्यंत पाणी मिळत नाही तोपर्यंत आंदोलन मागे न घेण्याचा पवित्रा महिलांनी घेतला आहे.



तळेगाव येथे गेल्या एक महिन्यांपासून पाणीपुरवठा पूर्णपणे विस्कळीत झाला आहे. पिण्याच्या पाण्यासाठी महिलांना उन्हातान्हात मैलोन्मैल भटकंती करावी लागत आहे. घरगुती वापरासाठी पाणी नसल्याने दैनंदिन कामकाज ठप्प झाले आहे. स्वच्छतेचा प्रश्नही गंभीर झाला आहे. ग्रामपंचायतीकडे वारंवार तक्रारी करूनही केवळ आश्वासनेच मिळत असल्याने महिलांनी संताप व्यक्त केला. केवळ पाणीच नाही, तर गावात इतर मूलभूत सुविधांचाही बोजवारा उडाला असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. गावातील महिला शौचालयांची दुरवस्था झाली असून गटारीचे सांडपाणी थेट रस्त्यावर वाहत आहे. यामुळे परिसरात प्रचंड दुर्गंधी पसरली असून नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. प्रशासनाने या अस्वच्छतेकडे पूर्णपणे पाठ फिरवल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र असंतोष आहे.

महिलांनी ग्रामपंचायत कार्यालयाला टाळे ठोकल्याने परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. 'आमच्या मूलभूत गरजांकडे दुर्लक्ष करणाऱ्या प्रशासनाला जागा करण्यासाठी हे पाऊल उचलले आहे', असे आंदोलक महिलांनी सांगितले. संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तातडीने गावात येऊन पाणीपुरवठा सुरळीत करावा आणि स्वच्छतेचा प्रश्न निकाली काढावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

# पश्चिम रेल्वेच्या झेडआरयूसीसी बैठकीत खान्देशातील प्रश्न मांडणार

प्रतिनिधी । धरणगाव

**पश्चिम रेल्वेच्या (झेडआर यूसीसी) सदस्यांची बैठक दि. १७ फेब्रुवारी रोजी मुंबईतील चर्चगेट येथे होणार आहे.**



या बैठकीस पश्चिम रेल्वेचे महाव्यवस्थापक प्रदीप कुमार, डीजीएम उज्ज्वल देव, आयजी अजय सदानी यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित राहणार आहेत. या बैठकीत पश्चिम रेल्वेतील प्रवाशांच्या समस्या, सुविधा व सुधारणा उपायांवर चर्चा होणार आहे. खान्देशातील रेल्वे प्रवाशांचे ज्वलंत प्रश्न मांडले जाणार आहेत, अशी माहिती झेडआरयूसीसी सदस्य तथा धरणगाव प्रवासी संघटनेचे सदस्य प्रतिक जैन यांनी दिली. खान्देशातील नागरिकांनी आपल्या सूचना व तक्रारी दि. १५ फेब्रुवारीपर्यंत व्हॉट्सअप क्रमांक ९९७०४१९६४२ वर पाठवाव्यात, असे आवाहन जैन यांनी केले आहे.